**राज्यातील तीर्थक्षेत्र / यात्रास्थळे विकसित करताना पिण्याच्या पाण्याच्या, जलनि:सारण किंवा गटाराच्या योजना कार्यान्वित करणे.**

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : ग्रापापु-१०९७/मुमंस५०/प्र.क्र.१५३/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : १६ एप्रिल, १९९८.**

**पहा :-** १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.ग्रापापु-१०९५/सीआर-११२४/पापु-०७ दिनांक १८ मे, १९९६

२) शासन निर्णय नगर विकास विभाग,क्र.संकीर्ण १८९६/८३०/७८/९६/नवि १८ दिनांक १७ मे, १९९६

३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्र.व्हीपीएम १०९६/२२०/२२ दिनांक २८.१०.१९९७

**परिपत्रक :-**

संदर्भातील क्रं.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामीण भागातील नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यासाठी दरडोई खर्चाचे निकष विहित करण्यात आले आहेत. तर नागरी पाणी पुरवठा योजना जलनि:सारण योजना व गटाराच्या कार्यक्रमासाठीच्या योजना या करिता दरडोई खर्चाचे निकष निश्चित करण्यात आलेले नाहीत.

२. संदर्भातील क्रं. २ व ३ येथील शासन निर्णयान्वये नागरी विभागातील व ग्रामीण विभागातील तीर्थक्षेत्र / यात्रा-स्थळांच्या विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे त्या विशिष्ठ भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजना त्याचप्रमाणे जलनि:सारण किंवा गटाराची योजना राबविताना त्या विभागाच्या नियत कालीन योजनांच्या नियमांच्या अंतर्गत करण्यात यावी व त्याची अंमलबजावणी अग्रक्रमाने व ताबडतोब करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(रु. न. देशमुख)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा. मुख्य मंत्र्याचे प्रधान सचिव.
२. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ) यांचे खाजगी सचिव.

३. मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे खाजगी सचिव.
४. मा. मुख्य सचिव (४अ) मा. अपर मुख्य सचिव, पा.पु. व स्व. विभाग
५. मंत्रालयीन विभागाचे सर्व प्रधान सचिव, सचिव
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई.
८. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
९. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद (सर्व)
१२. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१३. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१४. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
15. निवड नस्ती , पापु-०७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.